CB

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## (B. J. PRINT MEDIA-AEDP)

**वृत्तपत्रविद्या पदवी (मुद्रित माध्यम)**

**परीक्षा :- डिसेंबर २०२५**

**सत्र – १**

**विषय : भाषा (Language) (812-25-12)**

| दिनांक: १७/१२/२०२५ | गुण : ४० | वेळ : स.१०.०० ते दु. १२.०० |
|---|---|---|

**सुचनाः १. प्रश्न क्र. ५ आवश्यक. २. इतर कोणतेही २ प्रश्न सोडवा.**

प्र. १. निबंधाचे विविध प्रकार आणि त्यांचे स्वरुप स्पष्ट करा. (१५)

प्र. २. जाहिरातींचे विविध प्रकार आणि त्यासाठी वापरली जाणारी माध्यमे स्पष्ट करा. (१५)

प्र. ३. सारांश लेखन म्हणजे काय ? सारांश लेखनाच्या पायऱ्या स्पष्ट करा. (१५)

प्र. ४. तुमच्या आवडीची पाच पुस्तके मागवण्यासाठी पुस्तक भांडाराच्या संचालकास पत्र लिहा. (१५)

प्र. ५. **खालील गद्य उतारा वाचा व त्याचा एक –तृतीयांश सारांश तुमच्या शब्दात लिहा.** (१०)

फुले कोणाला आवडत नाहीत? ती सर्वांनाच आवडतात. कोणाला ती पूजेसाठी हवी असतात. कोणाला ती हारतुरे, गजरे किंवा वेणीसाठी हवी असतात. पण ‘फुलांसाठी फुले’ या भावनेने त्यांच्याकडे कोणी पाहत नाही. फुले शक्यतो वेलीवर किंवा फुलझाडांवर राहू द्यावीत. ती गळून पडली तर गोळा करावीत. पारिजातकाचा सडा आपण सतत पाहतच असतो. वेलीवरची फुले कोमेजण्याची वेळ जाणून घेतली व त्यापूर्वी काही तास ती तोडली तर फुलांच्या दृष्टीने ते न्यायाचे होईल. फुलांचा विचार असा भावनात्मक पातळीवरुन करु नये असे अनेकांना वाटेल; पण फुलांची कोमलता भावनांना स्पर्श करणारी असते. फुले म्हणजे निसर्गाचे भावकाव्यच जणू !

अशी ही फुले तशी कोणाचीच नसतात आणि तरीही ती सर्वांची असतात. रंग, रुप, गंध याची अखंड उधळण करुन आपले जीवन रसपूर्ण, भावपूर्ण करण्याचे काम ती मूकपणे करीत राहतात. या फुलांचे उतराई व्हावे कसे? जड वस्तूंची पूजा फुलांनी करण्याऐवजी फुलांची पूजा भावनांनी केली तर? ती अधिक फुलतील आणि जगाचे नंदनवन करतील. गावागावांत फुलांसाठी मंदिरे असावीत. घराघरात केवळ फुलांसाठी स्वतंत्र चौरंग असावा.

---